**महाराष्ट्र शासन**
सहसंचालक (उच्च शिक्षण)
१७ आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे – ४११ ००१
Website: www.jdhepune.org E-mail – jdhepune@gmail.com

दूरध्वनी क्रमांक – ०२० - २६१२७८३३, ०२०-२६०५१६३२ फॅक्स क्र. ०२०- २६०५१६३२

क्रमांक -ससं/उशि/मराठी भाषा धोरण/पुवि/२०२४/7061 दि. १४/१०/२०२४

प्रति,

१. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
२. कुलसचिव, सर्व विद्यापीठे, पुणे विभाग,
३. प्राचार्य / प्राचार्या,
सर्व अशासकीय अनुदानित /कायम विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान,
विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये,
**पुणे विभाग.**

विषय - **मराठी भाषा धोरणातील तरतुदींच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करणेबाबत..**

संदर्भ - १. महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र. संकीर्ण २०२४/प्र.क्र.११४/ वि शि ५ दिनांक ८.१०.२०२४.
२. सहसचिव, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्र. मगाधो-२०२४/प्रक्र.८०/भाषा २ (ई ८२७४९१) दिनांक ३०.९.२०२४.
३. सहसचिव, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्र. भाषाधो-२०२४/प्र.क्र.८२ (भाग २)/भाषा २ दिनांक २६.८.२०२४.

उपरोक्त विषय व संदर्भान्वये मा. मंत्री मंडळाने मराठी भाषा धोरणास दिलेल्या मान्यतेनुसार शासन निर्णय, मराठी भाषा विभाग, दिनांक १४.३.२०२४ अन्वये राज्याचे मराठी भाषा धोरण मराठी भाषा विभागातर्फे जाहीर करण्यात आले आहे. सोबत संदर्भाधीन पत्राची प्रत, निर्देश, सूचना पुढील कार्यवाहीसाठी सोबत जोडून पाठविण्यात येत आहेत. त्याप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी.

**(डॉ. अशोक उबाळे)**
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे १

सोबत - वरीलप्रमाणे.

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक-४२१,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई-४०० ०३२
दूरध्वनी क्र ०२२-२२७९३१७१ Email ID : vishi5.hted-mh@mah.gov.in

---

क्र. संकीर्ण २०२४/ प्र.क्र.११४/वि शि ५ दिनांक -: ०८/१०/२०२४

प्रति ,

संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे
संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई
संचालक, कला संचालनालय, मुंबई.

**विषय : मराठी भाषा धोरणातील तरतुदींच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याचे निदेश**

संदर्भ - १) सह सचिव, मराठी भाषा विभाग, मंत्रालय,मुंबई यांच क्र. मगाधो -२०२४/ प्र.क्र.८०/भाषा२ (ई ८२७४९१) दिनांक ३०/०९/२०२४ चे पत्र

२)सह सचिव, मराठी भाषा विभाग, मंत्रालय,मुंबई यांच क्र. भाषाधो -२०२४/ प्र.क्र.८२(भाग२)/भाषा२ दिनांक २६/८/२०२४चे पत्र

महोदय,

२. मा. मंत्रिमंडळाने मराठी भाषा धोरणास दिलेल्या मान्यतेनुसार शासन निर्णय, मराठी भाषा विभाग, दि.१४.०३.२०२४ अन्वये राज्याचे मराठी भाषा धोरण मराठी भाषा विभागातर्फे जाहीर करण्यात आले आहे.

३. तरी संदर्भाधीन पत्रांतील (प्रत सोबत जोडली आहे) निर्देश / सुचना आपल्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालये , अकृषी विद्यापीठे तसेच त्यांचेशी संलग्नीत महाविद्यालये यांना देण्यात याव्यात, ही विनंती.

आपला,

(शरद कोकाटे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत -- वरीलप्रमाणे

मराठी भाषा विभाग
नवीन प्रशासन भवन, ८ वा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दूरध्वनी क्र : ०२२-२२७९ ४१ ७० ई-मेल : vaishali.anapat@nic.in

क्रमांक : मभाधो-२०२४/प्र.क्र.८०/भाषा-२ (ई-८२७४९१) दि. ३०.०९.२०२४

प्रति,

अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,

अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग/अल्पसंख्यांक विकास विभाग/आदिवासी विकास विभाग/इतर मागास बहुजन कल्याण विभाग/उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग/उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग/उर्जा विभाग/कामगार विभाग/कौशल्य विकास व उद्योजकता विभाग/कृषी विभाग/ग्रामविकास व पंचायत राज विभाग/गृह विभाग/गृहनिर्माण विभाग/जलसंपदा विभाग/दिव्यांग कल्याण विभाग/नगर विकास विभाग/नियोजन विभाग/परिवहन विभाग/पर्यटन विभाग/पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग/पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग/महसूल विभाग/महिला व बालविकास विभाग/माहिती तंत्रज्ञान विभाग/मृद व जलसंधारण विभाग/वन विभाग/वस्त्रोद्योग विभाग/वित्त विभाग/विधि व न्याय विभाग/वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग/शालेय शिक्षण आणि क्रीडा विभाग/सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग विभाग/सामजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग/सामान्य प्रशासन विभाग/सार्वजनिक आरोग्य विभाग/सार्वजनिक बांधकाम विभाग/संसदीय कार्य विभाग/सांस्कृतिक कार्य विभाग मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

विषय - मराठी भाषा धोरणातील तरतुदींच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याचे निदेश देण्याबाबत.

संदर्भ - १. महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) अधिनियम, २०२१
२. महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरणे (राजभाषा) अधिनियम, २०२२
३. मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्र. भासस-२०१८/प्र.क्र.५०/भाषा-१, दि. १४.०३.२०२४

महोदय/महोदया,

विभागाच्या दि. १४.०३.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मराठी भाषा धोरणास मान्यता देण्यात आली आहे. या धोरणातील नियम क्र. ९.८ मधील तरतुदीनुसार, पुढील तक्त्यात नमूद करण्यात आलेल्या आपल्या अधिनस्त कार्यालयांकडून केल्या जाणाऱ्या दस्तऐवजांसह सर्व व्यवहार मराठी भाषेत प्राधान्याने करण्याबाबत निदेश दिले आहेत.

२. महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) अधिनियम, २०२१ अन्वये शासकीय कार्यालयांमध्ये प्रशासकीय कामकाजात मराठी भाषेच्या वापराची प्रयोजने निश्चित करण्यात आली आहेत. या अधिनियमातील नियम ३ (फ) नुसार "राज्य शासनाच्या कार्यालयांमध्ये वापरण्यात यावयाचे सर्व प्रमाणित नमुने, प्रपत्रे किंवा नोंदवह्या किंवा जनसंवाद व जनहित यांच्याशी संबंधित असणारे इतर कोणतेही दस्तऐवज मराठी भाषेत असणे आवश्यक आहे." तसेच नियम "५अ" नुसार, "या अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्येक मंत्रालयीन विभागाच्या दुय्यम आणि प्रशासकीय नियंत्रणाखालील कार्यालयांसह

राज्य शासनाचे प्रत्येक कार्यालय जनसंवाद व जनहित यांच्याशी संबंधित त्यांच्या धोरणांमध्ये मराठी भाषेचा वापर करण्यासाठी यथोचित तरतूदी करील." अशी तरतूद करण्यात आली आहे.

३. महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरणे (राजभाषा) अधिनियम, २०२२ मधील नियम क्र. ३ (१) मध्ये राज्य शासनाची मालकी असलेली, त्याचे नियंत्रण असलेली किंवा त्याने निधी पुरवठा केलेली वैधानिक महामंडळे, शासकीय, निमशासकीय कंपन्या किंवा कोणतेही प्राधिकरण यांच्या प्रशासकीय कामकाजातील मराठी भाषेच्या वापराची प्रयोजन निश्चित करण्यात आली आहेत. तसेच, नियम क्र. ४ नुसार ही कार्यालये या अधिनियमातील तरतुदींच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी, जनसंवाद व जनहित यांच्याशी संबंधित असणाऱ्या सर्व मंत्रालयीन विभाग आणि क्षेत्रिय कार्यालये त्यांच्या धोरणांमध्ये मराठी भाषेचा वापर करण्यासाठी सुयोग्य तरतुदी करतील असे निदेश देण्यात आले आहेत.

४. उपरोक्त नमूद तरतुदींच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याबाबत आपल्या स्तरावरुन संबंधितांना आवश्यक सूचना देण्याची विनंती आपणास करण्यात येत आहे.

आदरपूर्वक,

आपला विश्वासू,

(डॉ. नामदेव भोसले)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति :

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा), मुंबई
२. व्यवस्थापकीय संचालक, शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (सिडको), नवी मुंबई
३. व्यवस्थापकीय संचालक, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए), मुंबई
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी)
५. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (एमपीसीबी)
६. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (एमएसईबी) व त्यांच्या अन्य तीन सह कंपन्या
७. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी)
८. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ (एमटीडीसी)
९. सर्व शासकीय/निमशासकीय कंपन्या, मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे इत्यादी
यांना आवश्यक त्यापुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित.

प्रत : निवड नस्ती /कार्या.भाषा-२

मंत्रालयीन सेवा

सत्यमेव जयते

**मराठी भाषा विभाग**
नवीन प्रशासन भवन, ८ वा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दूरध्वनी क्र : ०२२-२२७९ ४१६९ Email ID:- vaishali.anapat@nic.in

---

क्रमांक: भाषाधो-२०२४/प्र.क्र.८२ (भाग-२)/भाषा-२ दिनांक: २६.०८.२०२४

प्रति,
अ.मु.स/ प्रधान सचिव/ सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

**विषय:-** राज्याचे मराठी भाषा धोरण व महाराष्ट्र राजभाषा अधिनियम

**संदर्भ:-** १. मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्रमांक -२०१८/प्र.क्र.५०/भाषा-१, दिनांक १४.०३.२०२४

२. महाराष्ट्र राजभाषा अधिनियम १९६४, सुधारणा अधिनियम २०१५ व २०२१

३. महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरणे (राजभाषा) अधिनियम, २०२२.

महोदय /महोदया,

महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ व त्यातील (सुधारणा) अधिनियम, २०१५ व २०२१ तसेच महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरणे (राजभाषा) अधिनियम, २०२२ यांनुसार सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व क्षेत्रीय कार्यालये व राज्य शासनाची सर्व कार्यालये यांच्यामार्फत "वर्जित प्रयोजने" वगळता सर्वसामान्य जनतेशी करण्यात येणारा सर्व प्रकारचा पत्रव्यवहार तसेच इतर सर्व कार्यालयीन कामकाज मराठी भाषेत करणे अनिवार्य आहे. सदर अधिनियमांमध्ये पुढील तरतुदींचा समावेश करण्यात आला आहे.

- शासकीय प्रयोजने स्पष्ट करण्यात आलेली आहेत,
- राज्य शासनाचे प्रत्येक कार्यालय, त्यांच्या कार्यालयीन कामकाजात आणि जनसंवाद व जनहिताशी संबंधित बाबींमध्ये मराठी भाषेचा वापर अनिवार्य करण्यासाठी यथोचित तरतूद करेल,
- राज्य शासनाच्या प्रत्येक कार्यालयात मराठी भाषा अधिकारी नेमण्यात येईल,
- सर्व कार्यालये त्यांच्या संकेतस्थळावर किंवा संदेशवानाच्या कोणत्याही साधनावर तसेच सादरीकरणामध्ये मराठी भाषेच्या वापरबाबत स्वयंप्रेरणेने प्रकटीकरण करतील,
- सदर अधिनियमांच्या तरतुदींची अंमलबजावणी न करणाऱ्या कर्मचाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे,

➤ अधिनियमांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी जिल्हा मराठी भाषा समिती तसेच राज्य स्तरावर राज्य मराठी भाषा समितीची तरतूद करण्यात आलेली आहे.

२. मराठी भाषा ही प्रशासकीय भाषा, ज्ञानभाषा आणि रोजगाराची भाषा म्हणून विकसित करणे व मराठी भाषेच्या वापराची व्याप्ती व गुणवत्ता यांमध्ये वृद्धी घडवून आणणे या हेतूने महाराष्ट्र राज्याचे मराठी भाषा धोरण २०२४, दिनांक १४ मार्च २०२४ रोजी जाहीर करण्यात आले आहे. सदर धोरणामध्ये पुढील मुद्द्यांचा उल्लेख करण्यात आला आहे.

मुद्दा क्र.९.१: *सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था, शासन महामंडळे, शासन अनुदानित कार्यालयांमध्ये अभ्यागतांशी व अभ्यागतांनी (परदेशस्थ व राज्याबाहेरील अमराठी व्यक्ती वगळता) मराठी भाषेतून संभाषण करणे अनिवार्य असेल. तसेच मराठी भाषेचा वापर व मराठीमध्ये संभाषण करण्याबाबत कार्यालयांमध्ये दर्शनी भागात फलक लावणेही अनिवार्य असेल. याबाबतची अंमलबजावणी काटेकोरपणे करणे. तसेच वापर न होणेबाबत शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचेविरुद्ध तक्रार, त्यानुषंगाने शिस्तभंगाची कारवाई व अपील यंत्रणा निश्चित करण्यात आली आहे,*

मुद्दा क्र.९.३: *"वर्जित प्रयोजने" वगळता सर्व शासकीय कार्यालयांमधील मूळ प्रस्ताव, सर्व पत्रव्यवहार, टिपण्या, आदेश, संदेशवहन मराठीतच असतील व कार्यालयीन स्तरावरील सर्व प्रकारची सादरीकरणे व संकेतस्थळे मराठीत असतील,*

मुद्दा क्र.३.१: *राज्यातील महाविद्यालये व विद्यापीठे यांच्या प्रशासकीय कामकाजात इंग्रजीसोबत मराठीचाही वापर अनिवार्य असेल.*

३. वरील मुद्द्यांच्या अनुषंगाने प्रशासकीय कामकाजाच्या सर्व स्तरावर मराठी भाषेचा वापर होणे अनिवार्य आहे. तथापि, जनसामान्यांकडून आपले सरकार तक्रार प्रणाली तसेच माहितीचा अधिकार इत्यादी माध्यमातून प्राप्त होणाऱ्या तक्रारी लक्षात घेता, काही कार्यालयांकडून मराठी भाषेच्या वापरासंबंधी तरतुदींची काटेकोरपणे अंमलबजावणी होत नसल्याचे दिसून येत आहे. तरी, सर्व संबंधित विभागाप्रमुखांनी विभागाच्या मंत्रालय स्तरावरील प्रशासकीय कार्यालयासोबतच सर्व अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयांना उपरोक्त संदर्भाधीन अधिनियमातील तरतुदी व धोरणातील उपरोक्त नमूद मुद्द्यांची अंमलबजावणी करणेसंबंधी सूचना द्याव्यात. जेणेकरून मराठी भाषेचा प्रचार, प्रसार, संवर्धन व विकास होऊन मराठी भाषेच्या वापराची व्याप्ती व गुणवत्ता वाढण्यास मदत होईल. आदरपूर्वक

आपला,

(डॉ. नामदेव भोसले)
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:- संग्रहार्थ (कार्यासन भाषा-२)